
महापालिकेतील भ्रष्टाचारावरून ठाकरे-चहल वाद

# ६ हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आदित्य ठाकरेंचा आरोप

## आयुक्त इकबालसिंह चहल यांच्याकडून आरोपांचे खंडन



**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे राजकीय भांडवल असलेल्या मुंबई महापालिकेवर मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट आहे. २०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत निसटता विजय मिळवून भाजपच्या मदतीने ठाकरेंनी पालिकेची सत्ता कशीबशी राखली होती. २०२२ मध्ये कोरोनास्थिती आणि इतर बाबींमुळे महापालिकेच्या निवडणुका लांबणीवर पडल्या, ते आजतागायत त्यावर प्रशासकीय राजवट कायमच आहे. एकीकडे प्रशासकीय राजवट सुरू असताना दुसरीकडे अनेक वर्षे महापालिकेवर अनभिषिक्त सत्ता गाजवणारी ठाकरे गटाची नेतेमंडळी आता पालिका प्रशासनावरच भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत. माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पालिकेचे आयुक्त आणि प्रशासक असलेल्या इकबालसिंह चहल यांच्यासह प्रशासनावर भ्रष्टाचाराचे आरोप लावले आहेत. त्यामुळे महापालिकेतील भ्रष्टाचारावरून ठाकरे विरूद्ध चहल असा वाद रंगला आहे.

### पालिकेच्या कामात गैरव्यवहार नाही : चहल

आदित्य ठाकरेंनी महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांच्यावर केलेल्या आरोपांवर स्वतः चहल यांनी स्पष्टीकरण दिले आहे. एका निवेदनाद्वारे चहल यांनी आपली भूमिका मांडली असून आरोप फेटाळले आहेत. ''मुंबई महापालिका प्रशासनाने विविध प्लॅटफॉर्म आणि माध्यमांद्वारे बोली प्रक्रिया तसेच प्रकल्पांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांना आणि समस्यांना सक्रियपणे आणि सातत्याने प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने प्रत्येक काम नियमांनुसार आणि प्रशासकीय कार्यपद्धतींचे पालन करूनच केले आहे. तसेच, नागरिकांच्या समस्या, त्यांचे सर्व प्रश्न, नागरिक आणि प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने केले जात आहे. महापालिकेच्या कामांमध्ये कुठलाही गैरव्यवहार झाला नसून करण्यात आलेले आरोप तथ्यहीन आहेत,'' असे स्पष्टीकरण चहल यांनी दिले आहे.

**सहा हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी नुकतीच महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली होती. या भेटीत ठाकरेंनी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून होत असलेल्या कामांमध्ये अनियमितता असून निविदांमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला. याप्रकरणी मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल यांच्यासह महापालिकेच्या कामांची लोकायुक्तांमार्फत चौकशीची मागणी ठाकरेंनी राज्यपालांकडे केली होती.

# नालेसफाईचे दावे म्हणजे रतन खत्रीचे आकडे!

## आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांचे मुंबई महापालिकेवर ताशेरे



**मुंबई दि. १२ : प्रतिनिधी**

''पावसाळा जवळ आला असताना मुंबई महानगरपालिकेकडून नालेसफाई झाली आहे, असे सांगत जे आकडे फेकले जात आहेत, ते केवळ रतन खत्रीचे आकडे आहेत,'' अशी टीका मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली.

केवळ २५ ते ३० टक्के काम झाल्याने नालेसफाईच्या कामात निष्काळजीपणा असून भाजप याबाबत असमाधानी असल्याचेही ते म्हणाले.

भाजप मुंबई अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी शुक्रवार, दि. १२ मे रोजी पश्चिम उपनगरातील नालेसफाईचा पाहणी दौरा केला. यावेळी त्यांच्यासोबत भाजपचे पदाधिकारी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

> “ या नालेसफाईत तुमच्या जवळचे, तुमच्या काळातले, कटकारस्थान करणारे कंत्राटदार आजही काम करत आहेत. तुमच्या जवळच्या असलेल्या कंत्राटदारांच्या कामातून शहरात पाणी तुंबणार नाही, अशी शाश्वती तुम्ही मुंबईकरांना देणार का?
>
> **–आ. अ‍ॅड. आशिष शेलार,** अध्यक्ष, मुंबई भाजप

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र.उप.प्र.अभि/२८२२/रस्ते/प.उ    दि. ११.०५.२०२३

**जाहीर सूचना**

उप प्रमुख अभियंता (रस्ते) प. उप 'ए' विंग, २ व ३ रा मजला, महानगरपालिका गोडाउन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्सच्या बाजूला, ९० फिट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई – ४०००१०१ यांच्या कार्यालयात दैनंदिन स्वछता करण्यासाठी हाऊस किपींगची सेवा पुरवण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. यासाठी सदर कामासाठी अशासकीय संस्थांची / Proprietorship फर्म/ नोंदणी कृत कंपनीची सोडत पध्दतीने निवड करण्याबाबतची जाहीर सूचना म.न.पा. portal.mcgm.gov.in संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे. सदर निविदा सोडत तारीख दि. १७.०५.२०२३ आहे.

इच्छुक संस्था या योजनेची सर्व माहिती निविदेसह मुख्य लिपिक (व्यय) उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उप यांच्या कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी शनिवार, रविवार व सुट्टीचा दिवस सोडून लेखी अर्ज रु. २६००/– अधिक १८% जीएसटी या किमतीत रोख स्वरूपात चलन काढून दि.१३.०५.२०२३ ते दि.१६.०५.२०२३ या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात. तसेच अनामत रक्कम रु.४७०००/– इतकी आहे.

सही/–
पीआरओ/३३६/जाहि./२०२३–२४    उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उप.

वेळेत निदान, वाचवी प्राण.

# ठाकरे गटाला लवकरच मोठे 'सरप्राईज': डॉ. श्रीकांत शिंदे

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

''सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेच्या बाजूने निकाल देत खरी शिवसेना कुणाची, यावर शिक्कामोर्तब केले आहे. ठाकरे गटाकडून राज्यातील जनतेची दिशाभूल करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. न्यायालयाने सत्तासंघर्षांवर निकाल देऊनही त्यांच्याकडून एक 'नॅरेटिव्ह' तयार केला जात असून त्याद्वारे लोक आपल्यासोबत असल्याचा दावा ते करत आहेत. त्यांचा हा दावा खोटा असून लोकांसोबतच ठाकरे गटात राहिलेले उर्वरित सर्व आमदार शिवसेनेत प्रवेश करणार असून लवकरच ठाकरेंना मोठे 'सरप्राईज' मिळणार आहे,''



असा इशारा शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटाला दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर शिवसेनेकडून शुक्रवारी 'बाळासाहेब भवन' या शिवसेना पक्ष कार्यालयात एक पत्रकार परिषद घेत ठाकरेंच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यात आले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंसह मंत्री उदय सामंत, आमदार संजय शिरसाट, शिवसेनेचे कायदेशीर बाजू लढवणारे अ‍ॅड. निहार ठाकरे आणि इतर उपस्थित होते.

खा. डॉ. श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, ''न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणांचे आम्ही स्वागत करत असून, न्यायालयाचा सन्मान करत आहोत. ठाकरेंच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या मुख्यमंत्रिपदावर भाजपच्या पाठिंब्याने एकनाथ शिंदे विराजमान झाले ते कायद्याने योग्यच होते, असा निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. अविश्वास मताच्या वेळी काही लोक न्यायालयात गेल्याने ठाकरेंची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली होती. ठाकरेंनी घाबरलेल्या अवस्थेत राजीनामा दिला होता, त्याला नैतिकतेचा कुठलाही आधार नव्हता. त्यामुळे त्यांनी नैतिकतेचा उल्लेख करू नये,'' असेही त्यांनी म्हटले आहे.

**मलिकांचा राजीनामा न घेणारे नैतिकतेवर बोलत आहेत!**

''नवाब मलिकांचा राजीनामा न घेणारे नैतिकतेवर बोलत आहेत. नैतिकतेच्या गोष्टी ज्यांना माहीत नसतील, त्यांनी जगाला नैतिकता शिकवू नये,'' असा टोला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

## पटोलेंचा राजीनामा 'मविआ'ची मोठी चूक



'शिंदे विरुद्ध ठाकरे' वादात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर सरकारसोबत विरोधी पक्षातही निकालाचे पडसाद उमटले आहेत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवारांनी काँग्रेसवर घणाघात केला आहे.

''१६ आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण विधानसभा अध्यक्षांकडे जाईल, याची मला कल्पना होती आणि तसे मी आधीच सांगितले होते. महाविकास आघाडीच्या (मविआ) काळात विधानसभा अध्यक्ष असलेले नाना पटोले यांनी राजीनामा देणे अयोग्य होते,'' या शब्दांत अजित पवारांनी नाना पटोलेंसह काँग्रेसवर निशाणा साधला आहे. तसेच, पटोलेंच्या राजीनाम्यानंतरही अध्यक्षपद रिक्त ठेवणे ही आमची चूक होती, अशी कबुलीही पवारांनी दिली आहे.

## आधीच्या मुख्यमंत्र्यांचा बेजबाबदारपणा नडला




आधीचे मुख्यमंत्री जपून नाही राहिले, त्यामुळेच हे सगळे घडले असल्याची प्रतिक्रिया राज ठाकरेंनी पत्रकारांना दिली. ''उद्धव ठाकरेंच्याविषयीचे प्रश्न मला विचारू नका,'' असेदेखील राज ठाकरे यावेळी म्हणाले.

''उद्धव ठाकरेंचा वेगळा पक्ष आहे आणि माझादेखील स्वतंत्र पक्ष आहे,'' असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले. विधानसभा अध्यक्षांच्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना राज ठाकरे म्हणाले की, ''कुठल्याही मुख्यमंत्र्याने जपूनच राहिले पाहिजे. आधीचे मुख्यमंत्री जपून राहिले नाहीत म्हणून हे सगळे चित्र आपल्याला दिसत आहे.'' दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय संभ्रमात टाकणारा होता, सगळी प्रक्रिया चुकली, पण उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यायला नको होता,'' असे महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

# माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंहांचे निलंबन मागे

## फडणवीस–शिंदे सरकारचा निर्णय

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**



महाविकास आघाडी (मविआ) सरकारला मुळापासून हादरवून सोडणाऱ्या १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात केंद्रस्थानी राहिलेले माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंह यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. मविआ सरकारच्या कार्यकाळात सिंह यांच्यावर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई मागे घेण्यात आली असून त्यांच्यावारील सर्व आरोप रद्द करण्यात आले आहेत. राज्याच्या तत्कालीन गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरून पोलीस अधिकारी सचिन वाझे मुंबईतील बारमालक आणि हॉटेल मालकांकडून महिन्याकाठी १०० कोटींची खंडणी वसूल करत असल्याचा गौप्यस्फोट परमवीर सिंह यांनी आपल्या पत्राद्वारे केला होता.

### निलंबनावरील निर्णय 'कॅट'नुसार : फडणवीस

''केंद्रीय प्रशासकीय लवाद, 'कॅट'चा निर्णय आल्याने, त्या आदेशानुसार त्यांचे निलंबन मागे झाले आहे. त्यांच्याविरुद्धची विभागीय चौकशी बंद करण्याचे आदेशसुद्धा 'कॅट'ने दिले होते. त्यामुळे परमवीर सिंहांच्या निलंबनाच्या बाबतीत घेण्यात आलेला निर्णय हा 'कॅट'नुसारच आहे,'' अशी स्पष्टोक्ती देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

**E-TENDER NOTICE NO. 1224/2023-24/**
**INTERNAL NIT NO. Date:- 12.05.2023**
**MUNICIPAL COUNCIL HINGOLI.**
**TENDER NOTICE**

Online Tenders (e-tender) in SBD form for the following work are invited on behalf of Governor of Maharashtra by the Chief Officer, Municipal council Hingoli Phone No. 02456 - 221727 E-mail- coud.hingoli@maharashtra.gov.in on GoM Electronic Tender Management System http://mahatenders..gov.in

SYSTEM TENDER NO. NIT NO. 1224 Dated 12.05.2023 (1stcall)

Online Tender is invited for the following works upto 29/05/2023 at 16.00 hours The details can be viewed and downloaded online directly from the GoM e-Tendering Portal http://mahatenders.gov.in from 13/05/2023 At 11.00.am hours (IST) onwards.

| Sr. No | Name of work | Approximate value of work | Bid Security (Rs.) | Cost of Document | Period of Completion |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Proposed Construction of CC Road & RCC Drain at Hingoli Municipal Council Hingoli.(39 roads) | 94,18,95,402/- | 47,09,500/- | 1,00,000/- | 18 months Including Monsoon |

For more details on the tender and bidding process may please visit the (http://mahatenders.gov.in) portal.

Sign./-
Chief Officer,
Municipal council Hingoli

**जाहीर सूचना**

**फलाट क्र. ४ येथील दक्षिण एफओबी आणि एमसीजीएम एफओबी जोडणाऱ्या कांदिवली येथील सध्याचा स्कायवॉक बंद करणे**

फलाट क्र. ४ येथील दक्षिण एफओबी आणि एमसीजीएम एफओबी जोडणाऱ्या कांदिवली येथील सध्याचा स्कायवॉक प्रस्तावित बुकिंग कार्यालय सामावून घेण्यासाठी पाडणे गरजेचे आहे. म्हणून कांदिवली येथील स्कायवॉक १६.०५.२०२३ पासून बंद ठेवण्यात येईल. प्रवाश्यांना होणाऱ्या गैरसोयीसाठी दिलगीर आहोत.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
G20
Azadi Ka Amrit Mahotsav
0174

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

**विक्री सूचना**

**श्री राधे मेटालिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परीसमापनामधील)**

परीसमापक: श्री. प्रभाकर कुमार

नोंदणीकृत कार्यालय: ५१२, आशिर्वाद बिल्डींग, ६४/ई, अहमदाबाद स्ट्रीट, कर्णाक बंदर, मस्जिद बंदर, मुंबई शहर, महाराष्ट्र ४०००९ भारत

संपर्क क्र.: + ९१ ९८१००११५३२

एक्सलेशन: उपरोक्त देण्यात आलेल्या संपर्क क्र. वर समस्या निवारण न झाल्यास + ९१ ९८१००११५३२ वर टेक्स्ट किंवा व्हॉटसअप मेसेज करा.

**ई – लिलाव**

दिवाळखोरी आणि नादारी संहिता २०१६ अंतर्गत मालमत्तांची विक्री

ई लिलावाचा दिनांक आणि वेळ : १४ जून २०२३ रोजी दु.३:०० वा. भा.प्र.वे. ते सायं.५.०० भा.प्र.वे.पर्यंत

इरठे सादरीकरणाचा दिनांक : १२ जून २०२३

पाहणीचा किंवा पूर्ण तपासणीचा दिनांक : ९ जून २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी (प्रत्येकी ५ मिनिटांचा अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई IV, द्वारे २४ मार्च २०२३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाच्या नुसार नियुक्ती करण्यात आलेल्या परीसमापकाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या परीसमापन मालमत्तेचा भाग असलेल्या श्री राधे मेटालिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परीसमापनामधील) च्या मालकीच्या असलेल्या मत्ता आणि मालमत्तांची विक्री.

| अनु. क्र. | संपत्ती | राखीव मूल्य (रु. मध्ये) | इरठे रक्कम (रु. मध्ये) | वाढ रक्कम (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संमतीनुसार विक्रीचा भाग असलेले जमीन आणि इमारत: प्लॉट क्र. ६४१ ई, प्रिन्सेस डॉक विभाग, अहमदाबाद स्ट्रीट, कार्नक बंदर, मुंबई ४००००९ वरील आशीवार्द प्रिमायसेस कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. द्वारे विकसित "आशीर्वाद बिल्डींग" च्या ५ व्या मजल्यावर स्थित कार्यालय क्र. ५१२. वाहन: ह्युन्डाई क्रेटा (१.६ सीआरडीआयएटी एसएक्स) हमी किंवा वित्तिय मत्ता: नॉन करंट इन्व्हेस्टमेंट, ट्रेड रिसिव्हेबल | ४०,०९,९२९ | ४,००,९९३ | १,००,००० |
| २ | स्टँडअलोन तत्वावर जमीन आणि इमारतीची विक्री: प्लॉट क्र. ६४१ ई, प्रिन्सेस डॉक विभाग, अहमदाबाद स्ट्रीट, कार्नक बंदर, मुंबई ४००००९ वरील आशीवार्द प्रिमायसेस कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. द्वारे विकसित "आशीर्वाद बिल्डींग" च्या ५ व्या मजल्यावर स्थित कार्यालय क्र. ५१२. स्टँडअलोन तत्वावर | १६,६०,००० | १,६६,००० | १००,००० |
| ३ | स्टँडअलोन तत्वावर वाहनाची विक्री: स्टँडअलोन तत्वावर ह्युन्डाई क्रेटा (१.६ सीआरडीआयएटी एसएक्स) | ७,९५,००० | ७९,५०० | १०,००० |
| ४ | स्टँडअलोन तत्वावर हमी किंवा वित्तिय मत्तांची विक्री: स्टँडअलोन तत्वावर नॉन करंट इन्व्हेस्टमेंट, ट्रेड रिसीव्हेबल | १५,५४,९२९ | १,१५,४९३ | ५०,००० |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती पुढील प्रमाणे:**

१. मान्यताप्राप्त सेवा प्रदाता मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजीस लिमिटेड (ऑक्शन टायगर) मार्फत "जसे आहे तसे", "जसे आहे तसे" आणि "जे काही आहे ते" वर ई-लिलाव आयोजित केले जाईल.

२. कंपनीच्या मालमत्तेबद्दलची संपूर्ण आणि तपशीलवार माहिती "ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज" मध्ये उपलब्ध आहे, जी संकेतस्थळावर म्हणजे https://ncitauction.auctiontiger.net. उपलब्ध आहे. संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी ही विक्री सूचना "ई-लिलाव प्रक्रिया दस्त ऐवज" सोबत वाचली पाहिजे.

३. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज ज्यामध्ये मालमत्तेचे तपशील, ऑनलाइन ई-लिलाव बोली फॉर्म, घोषणा आणि अंडरटेकिंग फॉर्म, ऑनलाइन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती https://ncltauction.auctiontiger.net या वेबसाइटवर उपलब्ध आहेत संपर्क: श्री. +९१-६३५१८९६८३४/०७९-६१२००५८६ आणि ६३५१८९६८३४ वर रामप्रसाद ramprasad@auctiontiger.net/ neha.gyani@auctiontiger.net/ support@auctiontiger.net (https://ncltauction.auctionedtiger.net या लिंकवर गेल्यावर) व्याज मिळेल. दोन पर्यायांपैकी एक वापरून नमूद केलेल्या कंपनीचा शोध घ्यावा लागेल, (१) कंपनीचे नाव (श्री राधे मेटालिक्स प्रायव्हेट लिमिटेड), किंवा (II) राज्य आणि मालमत्ता प्रकार).

४. ए) ब्लॉक ए साठी किमान एक पात्र बोलीदार असल्यास, इतर सर्व ब्लॉक्सचा ई-लिलाव रद्द केला जाईल आणि इतर सर्व ब्लॉक्ससाठी प्राप्त झालेला ईएमडी, असल्यास, संबंधित बोलीदारांना परत केला जाईल;

बी) ब्लॉक ए साठी कोणीही पात्र बोलीदार नसल्यास, पीस मील सेलची निवड लिक्विडेटरद्वारे ब्लॉक बी ते डी च्या मालमत्तेची विक्री करण्यासाठी केली जाईल. म्हणून, ब्लॉक बी ते डी च्या मालमत्ता स्वतंत्र आधारावर विकल्या जातील.

जर, कोणत्याही ब्लॉकची बोली रद्द केली गेली, तर ज्या पात्र बोलीदारांनी अशा ब्लॉकसाठी त्यांची बोली कागदपत्रे सादर केली आहेत त्यांना रद्द करण्याबद्दल सूचित केले जाईल आणि अशा सर्व बोलीदारांना त्यांच्या बोली कागदपत्रांमध्ये आणि ईएमडीमध्ये सुधारणा करण्याचा आणि सहभागी होण्याचा पर्याय असेल. ब्लॉक ए किंवा ब्लॉक बी, सी आणि डी साठी स्वतंत्रपणे बोली लावताना, जसे की परिस्थिती असेल, तर परीसमापकाकडून बोली रद्द झाल्याची माहिती मिळाल्यापासून ३ (तीन) दिवसांच्या आत त्यांनी याची लेख पुष्टी केली असेल. जर इरठे शिल्लक असल्यास भरणा करण्यात यावा. तथापि, १२ जून २०२३ नंतर ब्लॉक बी ते ब्लॉक डी मध्ये सहभागासाठी कोणताही नवीन ईएमडी स्वीकारला जाणार नाही.

५. इच्छुक बोलीदारांनी, त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे शीर्षक, स्थानिक कर, वीज आणि पाणी शुल्क, देखभाल शुल्क, जर काही असेल तर त्यांची स्वतंत्र चौकशी करावी आणि स्वतःच्या खर्चाने मालमत्तेची तपासणी करून स्वतःचे समाधान करावे. प्रभाकर कुमार यांच्याशी संपर्क साधून वर नमूद केलेल्या मालमत्तेची पाहणी संभाव्य बोलीदारांकडून पूर्वनियुक्तीसह साइटवर करता येईल.

६. पोर्टलवर (https://ncltauction.auctiontiger.net) ई-लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र बोलीदारांचे नाव लिक्विडेटरद्वारे निश्चित केले जाईल. ई-लिलाव सेवा प्रदाता (लिलाव वाघ) पात्र बोलीदारांना ईमेलद्वारे वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड प्रदान करेल.

७. जर ई-लिलाव बंद होण्याच्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावली गेली तर, समाप्तीची वेळ आपोआप अमर्यादित विस्तारासह ५ मिनिटांसाठी वाढविली जाईल. ई-लिलाव प्रक्रिया बंद केल्यावर सर्वाधिक बोलीची रक्कम (राखीव किंमतीपेक्षा कमी नाही) सादर करणाऱ्या बोलीदाराला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल आणि त्यासंबंधीचे संप्रेषण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जारी केले जाईल जे लिक्विडेटरच्या मान्यतेच्या अधीन असेल.

दिनांक: १३/०५/२०२३
ठिकाण : मुंबई

सही/-
प्रभाकर कुमार
परीसमापक, श्री राधे मेटालिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परीसमापनामध्ये)
आयबीबीआय नोंदणी. क्र.: आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन००७७४/२०१८-२०१९/१२३७३
पत्रव्यवहारासाठी पत्ता: इमारत क्र. १, ३ रा मजला, शिवा एन्क्लेव्ह, पीतमपूरा नवी दिल्ली ११००३४
ई-मेल आयडी: Prabhakar_acs@rediffmail.com संपर्क क्र. + ९१ ९८१००११५३२

# स्वच्छता, पर्यावरण आणि व्यवस्थापन विषयांना प्राधान्य आधारित हौसिंग सोसायट्यांना लाखोंची बक्षिसे

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

रविवार, दि. १४ मे रोजी गोरेगाव येथील नेस्को मैदानात मुंबईतील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या भव्य परिषदेचे भाजप विधान परिषद गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून परिषदेचा समारोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर म्हणाले की, ''मुंबईत ५० हजार गृहनिर्माण संस्था आहेत. त्यापैकी मुंबई हौसिंग फेडरेशनच्या २४ ते २५ हजार गृहनिर्माण संस्था सभासद आहेत. स्वच्छतेला प्रोत्साहन पर्यावरणपूरक वातावरण करण्यासाठी, व्यवस्थापन नीट होण्यासाठी, पाण्याचे व्यवस्थापन नीट होण्यासाठी, सामाजिक बांधिलकी अशा अर्थाने या गोष्टीची काळजी घेण्यासाठी गृहनिर्माण



सोसायट्यांना रविवारी होणाऱ्या सहकार परिषदेत हजारोंच्या हौसिंग प्रतिनिधींच्या उपस्थितीत बक्षिसे वितरित करून गौरवण्यात येणार आहे.''

या स्पर्धेसाठी ३७८ गृहनिर्माण संस्थांचे अर्ज आले आहेत. या स्पर्धेसाठी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या उपसमितीत झोन एकमध्ये फेडरेशनचे हेमंत दळवी, मुंबई बँकेचे भरत डिंगणकर, झोन डी. डी. आर. एकच्या एस.टी. काटे, सुनील मार्बल, डी. व्ही. काळे, दिनेश देवधरे यांचा समावेश आहे. झोन दोनमध्ये फेडरेशनचे आशिष गोयल, अजय बागल, मुंबई बँकेचे विष्णू सवल, झोन डी. डी. आर. दोनचे सुनील बनसोडे, शिरीष सकपाळ, दिवाकर कोयंडे, ईश्वर चव्हाण तर, झोन तीनमध्ये फेडरेशनचे यशवंत सावंत, व्यंकर सामंत, मुंबई बँकेच्या स्मिता गोईन, झोन डी. डी. आर तीनचे एस. पी. राणा, चंद्रशेखर डोंगरवार, एकनाथ नलावडे, संजय आधारकर यांचा आणि झोन चारमधील उपसमितीत फेडरेशनचे विजय शेलार, सुहास भैतेड, धनंजय बोरडे, मुंबई बँकेचे विनीत सावंत, स्मिता गोईन, झोन डी. डी. आर चारचे संजय रोकडे, पुरुषोत्तम भट, दयानंद चव्हाण, नितीन पवार, शशांक चौकीदार यांचा समावेश आहे.

### झोननुसार बक्षिसे देणार

प्रत्येक झोन (डी. डी. आर. १, डी. डी. आर. २, डी. डी. आर. ३ आणि डी. डी. आर. ४)मधील गटांना चार प्रकारची बक्षिसे देण्यात येणार आहेत. अ गटाला २५ हजार, ब गटाला १५ हजार, क गटाला ११ हजार आणि ड गटाला उत्तेजनार्थ ५ हजार, १०० रुपयांचे बक्षीस आहे. त्याचबरोबर 'ब' गटातून सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या संस्थेला एक लाख रुपयांसह चषक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**जाहीर नोटीस**

याद्वारे संबंधितांना कळविण्यात येते की, **श्री. किरण हरीभाऊ पाटील** यांची मौजे उसर, ता. वाडा, जि. पालघर येथील

**मिळकतीचे वर्णन**

| गट नंबर | क्षेत्र हे.-आर-प्रती | आकार |
|---|---|---|
| ३५४ | ०-३०-०० | ०-६६ |

वरील जमिन मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा गहाण, दान, दावा, वारस, वहिवाट व अन्य हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत निमस्वाक्षरीकारांना **सिद्धी सोफी कॉंप्लेक्स, शॉप नंबर ११५, कुडूस, ता. वाडा, जि. पालघर** या त्यांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल.

दि. १३.०५.२०२३    सही/–
**अ‍ॅड. धिरज सी. पाटील** (खरेदीदाराचे वकील)

**जाहीर समन्स**

मे. श्री. रविंद्र ठाकरे
प्रांत साहेब, इगतपुरी, नाशिक
अ‍ॅड. सलीम अब्दुल लतीफ शेख

आर.टी.एस. अपील नं. ०४/२०२३

इगतपुरी येथील मे. प्रांत साहेब, यांचे कोर्टात नाशिक

श्री. दिलीप गंगाराम पंडीत व इतर ....अर्जदार
यांसी
सा.वाले १. लक्ष्मी गंगाराम पंडीत
सा.वाले २. सुरेखा गंगाराम पंडीत
सा.वाले ३. पुष्पा रविंद्र अडांगळे .... सामनेवाले
सा.वाले ४ प्रदिप गंगाराम पंडीत
सर्व रा. रेल्वे टिकीट ऑफीस जवळ,
विठ्ठलवाडी, उल्हासनगर–२,
कल्याण, जि. ठाणे

ज्याअर्थी अर्जदार व इतर यांनी तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इगतपुरी येथील मौजे कवडदरा ह्या गावातील मिळकत यांसी गट नं. १७, गट नं. १४, गट नं. ५६, गट नं. १३७, गट नं. १३९, गट नं. १६७ या मिळकती संबंधी वारस नोंद करण्यासाठी सामनेवाले यांनी चुकीची माहिती देऊन बेकायदेशीर नोंद नं. ३६६ व ३६९ नोंदविलेली आहे त्याविरूद्ध अर्जदार इतर यांनी सदरचा अपील सदरहु नोंद नं. ३६६ व ३६९ रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे व सदरहु कामात सामनेवाले व कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी उपरोक्त न्यायालयात दि. ०१.०६.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालयात इगतपुरी येथे समक्ष अगर वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाचीही म्हणणे न आल्यास अपीलाचे कामकाज एकतर्फा चालविण्यात येईल.

माझ्या सहीनिशी व मे. प्रांत साहेबांच्या शिक्क्यानिशी दि. १२.०५.२०२३ रोजी दिली.

शिक्का    सही/– उपविभागीय अधिकारी
इगतपुरी, त्र्यंबकेश्वर

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, मध्य मुंबई ( सा. बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई– ४०००१८.**

E-mail-centralmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स – २४९३१९०२

जा.क्र. काअ/ममुंवि/ ई–निविदा/२२३६ दिनांक : ०४/०५/२०२३

**ई निविदा सूचना क्र. ०३ सन २०२३ – २०२४**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून ''बी–१'' नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ. क्र. | कामांचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | पु.ल.देशपांडे,महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई संकुलातील प्रशासकीय इमारतीची अंतर्गत व बाह्य संरचानात्मक दुरुस्ती, मजबुतीकरण करणे. | ४.४१ |
| २ | पु.ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई संकुलातील रविंद्र नाट्य मंदिर इमारतीची अंतर्गत व बाह्य संरचानात्मक दुरुस्ती, मजबुतीकरण करणे. | ३.४५ |
| ३ | पु.ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई संकुलातील रविंद्र नाट्य मंदिर इमारतीची अंतर्गत व बाह्य नुतनीकरण करणे. | ३.२५ |
| ४ | पु.ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई या इमारतीमधील वाहनतळाची दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | २.१६ |
| ५ | पु.ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई संकुलातील प्रशासकीय इमारतीची अंतर्गत व बाह्य नुतनीकरण करणे. | ७.३० |

| | |
|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक १२/०५/२०२३ रोजी १५.०० वाजता ते दिनांक १८/०५/२०२३ रोजी १५.०० पर्यंत |
| ई–निविदा पुर्व बैठक– | दिनांक १५/०५/२०२३ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई–निविदा उघडणे (शक्य झाल्यास ) | दिनांक १९/०५/२०२३ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

खालील संकेतस्थळावरुन ई–निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.gov.in २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

सही/–
**कार्यकारी अभियंता,**
मध्य मुंबई (सा.बां) विभाग,
वरळी मुंबई

डीजीआयपीआर २०२३/२०२४/७०७